10 MAY 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ध्येय साध्य करण्यासाठी स्वतः नेतृत्व करा

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के; पाचगणीत शिवाजी विद्यापीठाच्या शिबिरास प्रारंभ

**कोल्हापूर, ता. ९ :** वेगवेगळ्या प्रकारचे नेतृत्व करण्याची क्षमता प्रत्येकात कमी-अधिक प्रमाणात असते. त्या क्षमतेचा वापर सर्वांत आधी आपण स्वतःच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी करण्याची गरज असते. आपल्या आयुष्यात आपण जे ध्येय बाळगले आहे, ते साध्य करण्यासाठी आपण स्वतः नेतृत्व करण्यास शिकले पाहिजे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी काल (ता. ८) केले.

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि पाचगणी (ता. वाई, जि. सातारा) येथील बहाई ॲकॅडमीतर्फे आयोजित नेतृत्व विकास शिबिराच्या उद्‍घाटनप्रसंगी ते बोलत होते. बहाई ॲकॅडमीचे संचालक डॉ. लेसन आझादी म्हणाले, की विद्यार्थिदशेपासूनच आपण सकारात्मक पद्धतीने आपल्यातील विविध कलागुणांचा, नेतृत्वगुणांचा विकास केला पाहिजे. प्रत्येकाने नेताच व्हायला पाहिजे, असे अपेक्षित नसले तरी प्रत्येक जण एक चांगला माणूस मात्र निश्‍चितच व्हायला हवे.

जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पराग तांदळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले.



पाचगणी : शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि पाचगणी (ता. वाई, जि. सातारा) येथील बहाई ॲकॅडमीतर्फे आयोजित नेतृत्व विकास शिबिराचे उद्‍घाटन सोमवारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रल्हाद माने, प्रकाश गायकवाड, लेसन आझादी, आलोक जत्राटकर उपस्थित होते.

10 MAY 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सच्चे नेतृत्व निरपेक्षभावाने कार्यरत असते

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, पाचगणी येथे १७ व्या नेतृत्व विकास शिबिरास प्रारंभ

कोल्हापूर : प्रतिनिधी

सच्चे नेतृत्व अत्यंत निरपेक्ष भावनेने लोकांचे कार्य मार्गी लावण्यासाठी धडपडणारे असले पाहिजे, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली. शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि पाचगणी (ता. वाई, जि. सातारा) येथील बहाई ॲकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १७ व्या तीन दिवसीय 'नेतृत्व विकास शिबिराच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, नेतृत्व या बाबीला केवळ राजकीय इतक्या संकुचित अर्थाने पाहतो, हीच पहिली चूक आहे. नेतृत्व सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आदी सर्वच क्षेत्रांमध्ये असते. नेतृत्वाची सुरुवात लहानपणी सवंगडी जमवून खेळत असल्यापासूनच होत असते. त्यामध्ये जो एक जण साऱ्यांना जमवण्यामध्ये पुढाकार घेत असतो, तो त्या चमूचा नेताच असतो. असे वेगवेगळ्या प्रकारचे नेतृत्व करण्याची क्षमता प्रत्येकामध्येच कमी-अधिक प्रमाणात असते. त्या क्षमतेचा वापर सर्वात आधी स्वतःच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी करण्याची गरज असते.

बहाई अकादमीचे संचालक डॉ. लेसन आझादी म्हणाले, विद्यार्थीदशेपासूनच आपण सकारात्मक पद्धतीने आपल्यातील विविध कलागुणांचा, नेतृत्वगुणांचा विकास केला पाहिजे. प्रत्येकाने नेताच व्हायला पाहिजे, असे अपेक्षित नसले तरी प्रत्येक जण एक चांगला माणूस मात्र निश्चितच व्हायला हवा. प्रास्ताविकामध्ये विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी नेतृत्व विकास शिबिराच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. पराग तांदळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले. यावेळी मंचावर विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते. शिबिरामध्ये कोल्हापूर, सांगली व सातारा या तीनही जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांमधील निवडक ५० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले आहेत.

10 MAY 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

फोटो स्टोरी

# 'कमवा आणि शिका...'

बी. डी. चेचर

शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू दिवंगत डॉ. आप्पासाहेब पवार यांनी १९६८ मध्ये 'कमवा आणि शिका' ही योजना सुरू केली. वंचित समुदायातील आणि समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी ही योजना कार्यरत आहे. जे विद्यार्थी विद्यापीठ परिसरातील अधिविभागाच्या विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतात आणि ज्यांना आर्थिक अडचणी आहेत, अशा विद्यार्थ्यांना विद्यार्थी भवनात प्रवेशात प्राधान्य दिले जाते. या योजनेत दरवर्षी १०० विद्यार्थी आणि १०० विद्यार्थिनींची नोंदणी केली जाते. ही विद्यापीठाची एक अनोखी योजना आहे. कारण, कमवा आणि शिका योजनेंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन, शिकवणी, परीक्षा शुल्कात सवलत आणि वैद्यकीय सुविधाही विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रात उपलब्ध आहे. खर्चाची भरपाई करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थी विद्यापीठाच्या विविध अधिविभाग, विभाग, अभ्यास केंद्रे, उद्यान, परीक्षा भवन आणि सेवा-सुविधा केंद्रे येथे दररोज तीन तास काम करतात. त्यांचा हा चित्रमय प्रवास...



शिवाजी विद्यापीठाच्या समोरील बागेत काम करताना विद्यार्थी.



नर्सरीत रोपे तयार करताना विद्यार्थी.



झेरॉक्स केंद्रावर काम करताना विद्यार्थी.



अभ्यास केंद्रावर विद्यार्थिनीची नोंदणी करताना 'कमवा व शिका'चे विद्यार्थी.



शिवाजी विद्यापीठाच्या जलशुद्धीकरण केंद्रात काम सुरू असताना.

पुण्यनगरी

# एकाचवेळी पाच संशोधक विद्यार्थ्यांची पीएच.डी.

## शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागाचे विद्यार्थी



निशा मुडे पवार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम व मास कम्युनिकेशन विभागाच्या विभागप्रमुख व वरिष्ठ प्राध्यापक डॉ. निशा मुडे-पवार यांच्या मार्गदर्शनाखाली एकाचवेळी पाच संशोधक विद्यार्थ्यांनी पीएच.डी. प्रबंध सादर केला आहे. त्यापैकी चार विद्यार्थ्यांना नुकतीच विद्यापीठाची पीएच.डी. पदवी जाहीर झाली आहे. एकाच मार्गदर्शकाखाली पाच विद्यार्थ्यांनी पीएच.डी. प्रबंध सादर करण्याची ही विद्यापीठातील पहिलीच घटना आहे. याबद्दल कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी विभागाचे अभिनंदन केले आहे.

पीएच.डी. पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये अनुराधा इनामदार यांनी कॉर्पोरेट कम्युनिकेशन इन टाटा ग्रुप-ॲन ॲनॅलिटिकल स्टडी ऑफ हायपर मार्केट स्टार बझार इन वेस्टर्न महाराष्ट्र या विषयावर, सुप्रिया शेलार यांनी इम्पॅक्ट ऑफ प्रिंट मीडिया ऑन पब्लिक अंडरस्टँडिंग ऑफ एन्व्हायर्नमेंटल इश्युज ऑफ वेस्टर्न घाटस्, महाराष्ट्र विथ रेफरन्स टू दाजीपूर वाईल्ड लाईफ सेंच्युरीज या विषयावर, चंद्रशेखर वानखेडे यांनी इंग्लिश जर्नालिझम इन महाराष्ट्र विथ स्पेशल रेफरन्स टू टाइम्स ऑफ इंडिया, लोकमत टाइम्स ॲन्ड सकाळ टाइम्स या विषयावर, तर तानाजी पाटील यांनी इम्पॅक्ट ऑफ सोशल ॲन्ड बिहेव्हरल चेंज कम्युनिकेशन ऑन रुरल सॅनिटेशन प्रोग्राम विथ स्पेशल रेफरन्स टू कोल्हापूर डिस्ट्रिक्ट या विषयावर डॉ. निशा मुडे-पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध पूर्ण केला आहे.

जनसंपर्क कक्ष
10 MAY 2023
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कर्मवीर भाऊराव पाटील यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

थोर समाजसुधारक व शिक्षण प्रसारक कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज शिवाजी विद्यापीठात त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठांच्या मुख्य प्रशासकीय भवनात मंगळवारी सकाळी प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी, प्र–कुलगुरू डॉ. पाटील यांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासही पुष्प वाहून अभिवादन केले. याप्रसंगी विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले, उपकुलसचिव डॉ. एन.जे. बनसोडे, भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. संभाजी शिंदे, डॉ. जगदीश सपकाळे, डॉ. धनश्री शिंदे, डॉ. विद्या चौगुले, पी. टी. पाटील, अभिजीत पाटील, सुमंत दंडपठ, सुनिल जाधव, आनंदा वारके यांच्यासह प्रशासकीय सेवक, विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील यांना पुण्यतिथी दिनी मंगळवारी अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदी.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

# कर्मवीर भाऊराव पाटील यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** थोर समाजसुधारक आणि शिक्षणप्रसारक कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवाजी विद्यापीठात मंगळवारी (ता. ९) त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात सकाळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासही अभिवादन करण्यात आले. या वेळी वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले, उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे, भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. संभाजी शिंदे, डॉ. जगदीश सपकाळे, धनश्री शिंदे, विद्या चौगुले, पी. टी. पाटील, अभिजीत पाटील, सुमंत दंडपठ, सुनिल जाधव, आनंदा वारके उपस्थित होते.

पुण्यनगरी

# कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

कोल्हापूर : कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले. मुख्य प्रशासकीय भवनात प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील कर्मवीर पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासही पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले, उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे, भूगोल अधिविभागप्रमुख डॉ. संभाजी शिंदे, डॉ. जगदीश सपकाळे, डॉ. धनश्री शिंदे, डॉ. विद्या चौगुले, पी. टी. पाटील, अभिजित पाटील, सुमंत दंडपठ, सुनील जाधव, आनंदा वारके आदी उपस्थित होते.

लोकमत

# दीड हजार विद्यार्थ्यांनी दिली प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांना सोमवारपासून (दि. ८) सुरुवात झाली आहे. गुरुवारपर्यंत (दि. ११) या परीक्षा चालणार आहेत. मंगळवारी एम.ए. मास कम्युनिकेशन, एमसीए, एमएस्सी (कॉम्प्युटर सायन्स), बीजे, एमएस्सी (बॉटनी) यांसह विविध ११ अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा घेण्यात आली. १५१३ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. ८० विद्यार्थी गैरहजर राहिले. या अकरा विषयांच्या परीक्षांचे आयोजन सकाळी १०.३० ते १२.००, दुपारी १.०० ते २.३० व दुपारी ३.३० ते ५.०० या तीन सत्रांत आयोजित करण्यात आले होते. ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येणाऱ्या या परीक्षेसाठी कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव या जिल्ह्यांमध्ये परीक्षा केंद्रे आहेत.

जनसंपर्क कक्ष
10 MAY 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ प्रवेश परीक्षेला १५१३ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षेला १५९३ विद्यार्थ्यांपैकी १५१३ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील विविध अधिविभागात २०२३-२०२४ शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा सोमवारपासून ऑफलाईन पद्धतीने कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव जिल्ह्यात सुरू झाल्या आहेत. मंगळवारी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध १६ केंद्रांवर एमए मास कम्युनिकेशन, एमसीए, एमएस्सी संगणकशास्त्र, एमएस्सी अॅग्रो, एमएस्सी नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एम.टेक. रूरल टेक्नॉलॉजी, एमएस्सी (स्टॅट), एमएस्सी (बॉटनी) बी.लिफ. सायन्स, बॅचलर ऑफ जर्नालिझम या विषयाच्या परीक्षा सकाळी तीन सत्रात घेण्यात आल्या.

10 MAY 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षेस १५१३ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील विविध अधिविभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश परीक्षांना दि. ८ रोजी सुरुवात झाली. मंगळवारी विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा सुरळीत झाल्या. परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या १ हजार ५९३ पैकी १ हजार ५१३ विद्यार्थी उपस्थित होते. ऑफलाईन पद्धतीने दि. ११ मेपर्यंत या परीक्षा चालणार आहेत. विद्यापीठाची प्रवेश परीक्षा कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव या जिल्ह्यांमध्ये आयोजित केली आहे. परीक्षा सुरळीत होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठ समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे. मंगळवारी विविध १६ केंद्रांवर अकरा विषयांच्या परीक्षा घेण्यात आल्या. परीक्षेस विद्यार्थी बसण्याचे प्रमाण ९४.९८ टक्के इतके आहे.

10 MAY 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ११ अभ्यासक्रमांसाठी १५१३ परीक्षार्थी

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठातील विविध ११ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी मंगळवारी दिवसभरातील तीन सत्रांमध्ये एकूण १५१३ विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली, तर ८० जण गैरहजर राहिले.

विद्यापीठातील अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील संलग्नित महाविद्यालयांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा सोमवारपासून सुरू झाली. त्यात मंगळवारी एम. ए. मास कम्युनिकेशन, एमसीए सायन्स, एम. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, अॅग्रो केमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट, नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एम. टेक. (रुरल टेक्नॉलॉजी), बीजेसी., एम. एस्सी. स्टॅटिस्टिक, बॉटनी, इलेक्ट्रॉनिक्स, बी. लिब. सायन्स या विषयांसाठी सकाळी साडेदहा ते सायंकाळी पाच यावेळेतील विविध तीन सत्रांमध्ये परीक्षा झाली. दरम्यान, ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रात पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्यात आल्या. त्यातील सहा अभ्यासक्रमांचे ऑनलाईन निकाल विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने मंगळवारी जाहीर केले. त्यात बी. व्होक. न्यूट्रीशन अँड डायट, डिप्लोमा इन मेडिकल लॅब टेक्निशन, केन अॅग्री अँड शुगरटेक या अभ्यासक्रमांच्या विविध सत्रांचा समावेश आहे.

## प्रवेश परीक्षा; हिवाळी सत्रातील सहा परीक्षांचे निकाल जाहीर

### ‘एमएचटी-सीईटी’ परीक्षा सुरू

- अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (एमएचटी-सीईटी) मंगळवारपासून सुरू झाली. पहिल्या टप्प्यात पीसीएम ग्रुपची परीक्षा होणार आहे. जिल्ह्यातील वाठार तर्फ वडगाव, इचलकरंजी, साळोखेनगर, जयसिंगपूर, प्रयाग चिखली, उचगाव, पन्हाळा, महागाव, वारणानगर येथील केंद्रांवर सकाळी साडेसात ते दुपारी बारा आणि दुपारी साडेबारा ते सायंकाळी पावणेसात अशा सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात आली. त्यासाठी एकूण ९६६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.